# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग


270 Dr 9/8/24 H:45

दिनांक : ०९/०८/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर शहरातील जास्तीत जास्त भाग हरीत व्हावा याकरिता उल्हासनगर महानगरपालिके तर्फे वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये पावसाळयात घेण्यात येणारा महत्वाचा उपक्रम म्हणजे सिडबॉल तयार करणे.

दिनांक ०९/०८/२०२४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, मनपा शाळेचे विद्यार्थी, बचत गट महिला यांचे सहभागातून सिडबॉल तयार करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मागील वर्षी पावसाळयात हा कार्यक्रम घेण्यात आला होता. त्यावेळी विविध प्रजातींची एकुण २५०० सिडबॉल तयार केले होते. हे सिडबॉल सेंच्युरी येथील गणेश विसर्जन घाट परिसर, म्हारळ डंपिग ग्राउंड, वालधुनी नदी परीसर, कैलाश कॉलनी येथील स्मशानभुमीमध्ये फेकण्यात आले होते. आज एक वर्षानंतर याठिकाणी सुंदर असे हरीत क्षेत्र निर्माण झाले आहे. त्याचे चित्रीकरण कार्यक्रमाच्या वेळी दाखविण्यात आले.

बिजसंकलन संकल्पनेला पहिल्याच वर्षी उत्तम प्रसिध्द मिळाला असून कालपर्यंत या सिडबँक मध्ये फणस, अशोका, खजूर, जांभूळ, लिची, चेरी अशा विविध प्रकारच्या १४०६ बिया संकलित झाल्या आहेत. यामध्ये श्रीम. सरला डेव्हीड, मनपा कर्मचारी यांनी सिडबॉलमध्ये १००० बिया टाकल्या आहेत. याबद्दल मा.आयुक्त यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या सिडबँकमध्ये लोकसहभागातुन जमा झालेल्या १४०६ बिया सिताफळ, रामफळ, फणस, अशोका, बदाम, आवळा, बोर, डाळींब, मोसंबी, अरेका पाम, खजूर, पेरु, जांभूळ, काकडी, अंबाडी, चिकू अशा विविध १६ प्रजातींचे उल्हासनगर महानगरपालिकेने ठरविलेले २००० चे उद्दीष्ट व कार्यक्रमाच्या वेळी उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी व बचत गटाच्या महिला यांनी आप-आपल्या घरातून आणलेल्या बिया असे एकुण ३५०० सिडबॉल तयार करण्यात आले हे सिडबॉल दोन दिवस सुकल्यानंतर खेमाणी डंपिंग ग्राउंड, वालधुनी नदी परिसर, गणेश विसर्जन घाट परिसर या ठिकाणी फेकण्यात येणार आहेत.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करवी.